नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०५/२०२४ (शनिवार) सायंकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

## वाहनासह एकुण ३,०२०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक २३/०५/२०२४ रोजी पोस्टे खापरखेडा येथील पोलीस स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, **ट्रक क्रमांक एम एच—४०/४३०३** द्वारे मौजा वारेगाव शिवार येथे अवैधरीत्या विनापरवाना रेती (वाळु) ट्रकमध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून नाकाबंदी केली असता **ट्रक क्रमांक एम एच—४०/४३०३** चा चालक **आरोपी नामे— १) अमन उपासराव मनगटे, वय २३ वर्ष, रा. वारेगाव ता. कामठी जि. नागपूर** व मालक **२) सोनु उर्फ प्रणव राजेश मेश्राम वय २८ वर्ष, रा. वारेगाव ता. कामठी जि. नागपूर** यांनी अवैधरित्या रेती उत्खनन करून अर्धा ब्रास रेती किंमती २०००/— रुपयाची उत्खनन करून वाहतुक करतांना मिळून आल्याने आरोपींच्या ताब्यातून ट्रक क्रमांक एम एच—४०/४३०३ किंमती ३,००,०००/— रूपये, अर्धा ब्रास रेती किंमती २०००/— रुपये असा एकूण ३,०२०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपी **१) अमन उपासराव मनगटे, वय २३ वर्ष, रा. वारेगाव ता. कामठी जि. नागपूर** व मालक **२) सोनु उर्फ प्रणव राजेश मेश्राम वय २८ वर्ष, रा. वारेगाव ता. कामठी जि. नागपूर** यांचेविरुद्ध पोस्टे खापरखेडा येथे कलम ३७९, १०९ भादंवि. , सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम—१९६६, सहकलम ४, २१ खानी आणि खनीजे (विकास आणि नियमन) अधिनियम—१९५७, सहकलम २१ मोवाका. अन्वये पो. स्टे. खापरखेडा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक धनाजी जळक, पोलीस उपनिरीक्षक प्रशांत खोब्रागडे यांनी केली.

# अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

## वाहनासह एकुण ३५५५०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत दिनांक २४/०५/२०२४ रोजी टिप्पर द्वारे अवैध रेती वाहतुक केली जात आहे. अशा मिळालेल्या गोपनिय माहीती वरुन पोलीस स्टेशन भिवापूरचे पथकाने पोस्टे हद्दीत मौजा उमरेड रोड तहसिल समोर भिवापुर व मौजा उमरेड रोड बाजार समिती समोर भिवापुर येथे नाकाबंदी लावुन अवैध वाहतुक करणारे एकूण ०२ टिप्पर थांबवुन तपासले असता १) १२ चक्का टिप्पर क्र. एम एच— ४०/ सी एम— ९२२० किंमती १५,००,०००/—रू. व त्यामध्ये ६ ब्रास विना रॉयल्टी भरलेली रेती किं. ३०,०००/—रू. २) १२ चक्का टिप्पर क्र. एम एच— ४०/ए टी—४४७१ किंमती २०,००,०००/—रू. व त्यामध्ये ०५ ब्रास विना रॉयल्टी भरलेली रेती किंमती २५,०००/—रू. असे रेतीसह टिप्पर ताब्यात घेवुन असा एकूण दोन्ही वाहनासह ३५५५०००/— रु. चा मुददेमाल जप्त केला आहे.

त्यावरुन १२ चक्का टिप्पर क्र. एम एच— ४०/सी एम— ९२२० चा चालक **आरोपी नामे— १) फिरोज इसमाइल पठान रा मोठा ताजबाग नागपुर व मालक २)** प्रमोद हरिभाउ वैध रा. शिवागीनगर  नागपुर तसेच १२ चक्का टिप्पर क्र. एम एच— ४०/ए टी—४४७१ चा चालक **आरोपी नामे— ३)** पुश्पकुमार नरेंद्र गजभिये, वय २६ वर्ष, रा. रूयाळ ता पवनी जि भडारा ४) मालक नामे— दिवाकर राने रा. वडेगाव ता. पवनी जि. भंडारा अशा एकूण ०४ आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९, ३४ भादंवी सहकलम ४८(७), ४८(८) महा जमीन महसुल अधिनियम १९६६, सहकलम ४, २१ खाण आणि खनिज अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनीक मालमत्ताचे नुकसान प्रतिबंध अधिनियम १९८४ अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली **पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार** सपोनि जयप्रकाश निर्मल, पोलीस नायक रविंद्र जाधव, पोलीस अंमलदार निकेश आरीकर, दीपक ढोले, मनोज चाचेरे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर